2022 XI 10 | 0230 | Seat No. | | | | | |

Time : 1½ Hours | **FIRST TERM** | **MARATHI LANG. I**

**Subject Code**

| H | 4 | 4 | 1 | 2 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 40 (Printed Pages : 12) Maximum Marks : 40**

**सूचना :** (*i*) प्रश्नपत्रिकेचे एकूण **चार** विभाग आहेत.

(*ii*) प्रत्येक प्रश्नाखाली उत्तराचे A, B, C आणि D असे चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी एक उत्तर अचूक आहे.

(*iii*) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका (OMR Sheet) दिलेली आहे. प्रत्येक प्रश्न-क्रमांकासमोर चार पर्यायांसाठी क्रमाप्रमाणे वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले एकच वर्तुळ बॉलपेनने रंगवा.

(*iv*) एकदा बॉलपेनने वर्तुळ रंगवून नोंदवलेली उत्तरे बदलता येणे अशक्य आहे. त्यामुळे वर्तुळे रंगविताना योग्य ती काळजी घ्यावी.

(*v*) अचूक उत्तराचे वर्तुळ रंगवलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी एक गुण. उत्तर चुकल्यास शून्य गुण. मात्र नकारात्मक (Negative) मूल्यांकनाचा अवलंब केला जाणार नाही.

(*vi*) उत्तरे नोंदविण्यासाठी एकच उत्तरपत्रिका दिली जाईल.

(*vii*) उत्तरे नोंदविण्यासाठी काळ्या अथवा निळ्या बॉलपेनचा वापर करावा.

## विभाग I : गद्य

1. तुकारामाच्या मते पिंपळावर कोणते भूत असते ? 1

(A) खवीस

(B) मुंजा

(C) हडळ

(D) समंध

2. रश्मीच्या सासुबाई किती वर्षांच्या होत्या ? 1

(A) एक्क्याऐंशी

(B) एकावन्न

(C) एकाहत्तर

(D) एकसष्ट

3. पंधरा वर्षापर्यंत मुलांच्या समोरचे आदर्श कोण असतात ? 1

(A) आजोबा, आजी आणि शाळेतील शिक्षक

(B) शाळेतील शिक्षक आणि शाळेतील मित्र

(C) आई, वडील आणि नातेवाईक

(D) आई, वडील आणि शाळेतील शिक्षक

4. हिरीच्या आईने लेखिकेसाठी कोणता स्वयंपाक केला ? 1

(A) मुगाची उसळ आणि जोंधल्याची भाकरी

(B) पटणीची भाकरी आणि वाटाण्याची उसल

(C) चवळीची उसल आणि पटणीची भाकरी

(D) चवळीची उसल आणि तांदळाची भाकरी

5. ''अरे बाबा परीक्षेचा नंबर कुठं येईल, काही सांगता येत नाही''. 1

(A) रश्मीने लेखक व त्यांच्या पत्नीला

(B) लेखकाच्या पत्नीने लेखकाला

(C) रव्या रानडेने लेखकाला

(D) लेखकाने रव्या रानडेला

6. 'येस हो बाय! आली गो लक्ष्मी जशी.' हे वाक्य कुणी कोणाला उद्देशून म्हटले ? 1

(A) हिरीच्या आईने ललिताला

(B) हिरीच्या आईने लेखिकेला

(C) रमादेवीने हिरीला

(D) ललिताने हिरीच्या आईला

7. तुकारामाची दातखिळीच बसली कारण ...................... 1

(A) भूत त्याच्याकडे बघून हसत होते

(B) पाव्हणा बसला होता ती सागा रिकामी होती

(C) पाव्हण्याने त्याला भुताची गोष्ट सांगितली

(D) पाव्हणा खवळून त्याच्या अंगावर धावून आला

8. प्राचीनकाळात भारतीय बुद्धिवंतांनी केलेल्या संशोधनाचे पुनरुज्जीवन आता अत्यंत गरजेचे झाले आहे कारण ..................... 1

(A) भारतात नवीन संशोधन होत नाही

(B) तरुण संशोधनाकडे आकर्षित होतील

(C) भारतातील बेरोजगारी कमी होईल

(D) त्यातूनच या देशामध्ये ज्ञानाची भक्कम परंपरा उभी राहील

## विभाग II : पद्य

9. संत समुदाय भेटल्यावर प्रापंचिकाने काय करावे ? 1

(A) त्यांच्या पायावर लोटांगण घालावे

(B) त्याना दुरून नमस्कार करावा

(C) त्याना आपल्या घरी आणावे व आशिर्वाद घ्यावा

(D) त्याना प्रपंचाच्या अडचणी सांगाव्यात

10. जात्यावर कोणते दळण दळले जात आहे ? 1

(A) जोंधळ्याचे

(B) मक्याचे

(C) परमार्थाचे

(D) प्रपंचाचे

11. समरपुराच्या वारकऱ्यांना कोण बोलावत आहे ? 1

(A) अग्नीदेवता

(B) रणदेवता

(C) युद्धदेवता

(D) समरदेवता

12. माणसाच्या प्राक्तनाशी कोण खेळ खेळतो ? 1

(A) दुष्काळ

(B) देव

(C) निसर्ग

(D) पारुस

13. संत शेख महंमद आंब्याचे उदाहरण देतात कारण .................. 1

(A) अमृतफळाचे वर्णन करायचे आहे

(B) साधूच्या अंत:करणाबद्दल सांगायचे आहे

(C) तारुण्य आणि वृद्धपणाबद्दल माहिती द्यायची आहे

(D) वरदळ गोमटे असलेल्या कारस्थानी अभक्ताबद्दल सांगायचे आहे

14. कवी कुसुमाग्रजांनी आवाहन कविता लिहिली कारण................ 1

(A) पाकीस्तानने भारतावर चढाई केली होती

(B) चीनने भारतावर आक्रमण केले होते

(C) श्रीलंका भारतावर हल्ला करण्याच्या तयारीत होती

(D) रशिया भारताला वारंवार धमकावत होता

15. खालीलपैकी कोणता चरण पाठ्यपुस्तकातील कवितेप्रमाणे आहे ? 1

(A) सासु आणि सासरा दीर तो तिसरा

(B) सासु आणि सासरा तो दीर तिसरा

(C) सासु आणि सासरा तिसरा तो दीर

(D) सासु आणि सासरा तिसरा दीर तो

16. खालीलपैकी कोणता चरण पाठ्यपुस्तकातील कवितेप्रमाणे आहे ? 1

(A) वाळलेले हे उदास पुन्हा बहरतील मळे

(B) उदास वाळलेले हे पुन्हा बहरतील मळे

(C) उदास हे वाळलेले पुन्हा बहरतील मळे

(D) पुन्हा वाळलेले उदास हे बहरतील मळे

## विभाग III : व्याकरण

17. "घरभर घमघमीत वास सुटला" या वाक्यातील विशेषण ओळखा : 1

(A) वास

(B) घमघमीत

(C) सुटला

(D) घरभर

18. “मी नजरेनंच हसून तिचं स्वागत केलं.” या वाक्यातील क्रियापद कोणते ? 1

(A) केलं

(B) हसन

(C) तिचं

(D) मी

19. ‘झाडाची पाने जोराने सळसळत होती.’ या वाक्यातील जोराने शब्दाची जात कोणती ? 1

(A) विशेषण

(B) उभयान्वयी अव्यय

(C) शब्दयोगी अव्यय

(D) क्रियाविशेषण अव्यय

20. ‘केव्हातरी हिरी आणि लीली माझ्या जिवलग मैत्रिणी झाल्या’. या वाक्यातील उभयान्वयी अव्यय कोणते ? 1

(A) हिरी

(B) मैत्रिणी

(C) आणि

(D) माझ्या

21. ‘विकसित’ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ? 1

(A) सुविकसित

(B) अविकसित

(C) अतिविकसित

(D) कुविकसित

22. खालीलपैकी कोणता शब्द विरुद्धार्थी शब्दाची जोडी **नाही** ? 1

(A) आकाशपाताळ

(B) धर्मअधर्म

(C) दीनदुबळा

(D) सावधबेसावध

23. खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची जोडी कोणती ? 1

(A) योग्य × सुयोग्य

(B) योग्य × संयोग

(C) योग्य × यथायोग्य

(D) योग्य × अयोग्य

24. 'गगन' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ? 1

(A) नभ

(B) पाताळ

(C) सृष्टी

(D) पृथ्वी

25. खालीलपैकी समानार्थी शब्दांची चुकीची जोडी शोधा : 1

(A) मुलगी—कन्या, पुत्री, तनया

(B) धन—द्रव्य, संपदा, दौलत

(C) सूर्य—भास्कर, मित्र, शशी

(D) समुद्र—सागर, रत्नाकर, दर्या

26. खालीलपैकी कोणता शब्द 'देव' या अर्थाचा **नाही** ? 1

(A) ईश्वर

(B) आनंदसागर

(C) भगवंत

(D) परमेश्वर

## विभाग IV : लेखन

27. 'आयुक्त' या शब्दासाठी पारिभाषिक शब्द कोणता ? 1

(A) President

(B) Chairman

(C) Commissioner

(D) Treasurer

28. 'कार्यक्षमता' या शब्दासाठी पारिभाषिक शब्द कोणता ? 1

(A) Ability

(B) Formality

(C) Capacity

(D) Simplicity

29. 'Bureaucracy' या पारिभाषिक शब्दासाठी योग्य मराठी शब्द कोणता ? 1

(A) लोकशाही

(B) नोकरशाही

(C) दडपशाही

(D) कुतुबशाही

30. खाली दिलेल्या पर्यायांपैकी एक वाक्प्रचार आहे, तो पर्याय ओळखा : 1

(A) दुष्काळात तेरावा महिना

(B) पोटात कावळे ओरडणे

(C) बोलाचीच कढी बोलाचाच भात

(D) दुरून डोंगर साजरे

31. ‘अट्टहास करणे’ या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ असलेला पर्याय शोधा : 1

(A) धिंगाणा घालणे

(B) खूप गोंधळ घालणे

(C) स्पष्टपणे सांगणे

(D) पराकाष्ठेचा प्रयत्न करणे

32. खालील प्रश्नात रिकाम्या जागी लिहिण्यासाठी दिलेल्या चार वाक्प्रचारांपैकी योग्य ठरेल तो पर्याय शोधा. 1

‘खूपदा सांगून मुलाने ऐकलं नाही तेव्हा आईने ........................

(A) वाचा बंद होणे

(B) डोळे वटारणे

(C) अंगावर काटा येणे

(D) चाहूल लागणे

33. ‘शिंक्याचे तुटले, बोक्याचे फावले’ या म्हणीशी संबंधित अर्थाचा योग्य पर्याय निवडा : 1

(A) एखाद्याचे नुकसान होणे, पण त्यामुळे दुसऱ्याचा फायदा होतो

(B) गोड गोड बोलून फसवणे

(C) आपल्या ऐपतीप्रमाणे वागावे

(D) गर्विष्ठ माणसावर अपमानीत होण्याची वेळ येते

34. खाली म्हणीचा अर्थ दिला असून योग्य म्हण पर्यायातून निवडा.

दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी इच्छा केली की आपलेच वाईट होते. 1

(A) अति तिथे माती

(B) शहाण्याला मार शब्दांचा

(C) चिंति परा ते येई घरा

(D) ऐकावे जनाचे करावे मनाचे

35. व्यवहारात प्रत्येकाला त्याच्या दर्जाप्रमाणे वागवण्यातच आपला फायदा असतो म्हणतात ना.... 1

(A) दाम करी काम

(B) पायातील वहाण पायीच बरी

(C) नावडतीचे मीठ अळणी

(D) उथल पाण्याला खळखळाट फार

36-40. खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

खुरटी झुडुपे हुंगत चाखत
उंच पहाडावरती बकरी
चकित उभी: तिज खालुन बघते
धनिण तिची तर रंगबावरी

जर्द किनारी लाल लहंगा
उघड्या टाचांवर घुटमळतो
माथ्यावरचा रुमाल पिवळा
काळ्या कुडत्यावर फडफडतो

बटाबटांच्या असंख्य वेण्या
दो बाजूंनी भाळावरती
लवल्या कानांमधुन रुपेरी
झुमरु खांद्यावरती झुलती

नभसन्मुख हिमउजळ चेहरा
हिमगंगेचा जोष तयावर
डोल्यामध्ये झुकलेले अन्
देवदारबन गहन गूढतर

**– इंदिरा संत**

**रंगबावरी**

36. पहाडावरची बकरी काय हुंगत चाखत आहे ? 1

(A) पिवळा रुमाल

(B) लाल लहंगा

(C) खुरटी झुडुपे

(D) रुपेरी झुमरु

37. काळा कुडता घातलेली कवितेतील व्यक्ती कोण ? 1

(A) पहाडावरची रंगबावरी

(B) बकरीची धनिण रंगबावरी

(C) हिमगंगेजवळची रंगबावरी

(D) देवदारबनातील रंगबावरी

38. 'भाळ' म्हणजे काय ? 1

(A) गाल

(B) कान

(C) नाक

(D) कपाळ

39. कविता वाचताना कुठल्या पर्वताचे चित्र डोल्यांसमोर उभे राहते ? 1

(A) सह्याद्री

(B) सातपुडा

(C) हिमालय

(D) मलयगिरी

40. रंगबाबरीचे सौंदर्य कुठल्या ओळीतून दिसून येते ? 1

(A) चकित उभी तिज खालून बघते

(B) दो बाजूंनी भाळावरती

(C) नभसन्मुख हिमउजळ चेहरा

(D) डोळ्यामध्ये झुकलेले अन्